# नियमित दिवाणी दावा क्र.१९०/२०१४ मधील निशाण क्र.१९६ खालील आदेश

[ CNR No.MHKO090002992014 ]

प्रस्तुतचा अर्ज वादीमार्फत १ महिन्याचा कालावधी मिळण्याकरिता सादर करण्यात आला आहे. अर्जामध्ये मुख्यत: असे कथन नमूद आहे की, सदरहू काम चौकशीवर नेमले असून त्यांच्या विधीज्ञांची तब्येत ठीक नसलेने सदरील काम चालविणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे १ महिन्याची मुदत मिळावी.

२. प्रस्तुतच्या अर्जास विरुध्द पक्षाने तीव्र आक्षेप नोंदविला. अर्जातील गुणदोष यावर कारणमिमांसा करण्याअगोदर हे नमूद करणे गरजेचे आहे की, प्रकरण हे १० वर्षांपेक्षा जास्त जुने असून दि.२७.०६.२०२५ रोजी युक्तिवादावर नेमणेत आले होते. त्यानंतर वादीमार्फत प्रकरणात युक्तिवाद करण्याकरिता सातत्याने जवळपास १६ ते १७ तहकुबी घेण्यात आल्या. मागील ३ ते ४ तारखांना या न्यायालयाच्या दुरूस्तीबाबतचा आदेश मा. उच्च न्यायालय येथे आव्हानित केल्यामुळे तहकुबी घेण्यात आल्या. तथापि, मा. उच्च न्यायालय येथे वादीमार्फत सादर केलेला अर्ज खारीज करण्यात आल्या, याबाबत प्रतिवादी यांचे विधीज्ञांनी न्यायालयास कळविले. दि.१२.०१.२०२६ तसेच त्यापुर्वी सातत्याने केलेले आदेश यामध्ये स्पष्टपणे वादी यांना निर्देश देण्यात आले होते की, पुढील तारखेस त्यांनी अंतिम युक्तिवाद सादर करावा, अन्यथा त्यांची बाजु गुणदोषावर निकाली काढण्यात येईल.

सदरील आदेशानंतर साधारणत: १ महिन्याचा कालावधी देखील वादी यांना देण्यात आला. तरी देखील आज पुन्हा वादीमार्फत तहकुबीचा अर्ज सादर करण्यात आला. सदरील अर्ज यास कुठलेही वैद्यकीय दस्तऐवज देखील जोडण्यात आलेले नाहीत. मागील सादर केलेल्या अर्जांवर वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आजरोजी सादर केलेला अर्ज हा मंजूर होण्यास पात्र ठरत नाही व मागील तारखेस पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे आजरोजी प्रस्तुतच्या प्रकरणी अंतिम युक्तिवाद घेण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## **आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NARENDRA
Date: 2026.02.21 16:56:46 +0530

स्थळ : गडहिंग्लज.        ( न. श्री. पुरी )

दिनांक : २१.०२.२०२६.        दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

गडहिंग्लज